# प्रेसनोट

दिनांक ३१.०८.२०१८

**श्री. गोवर्धन निलकंठराव लांडगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, श्री. उमेश भगवानराव पवार, वरिष्ठ सहाय्यक, दोघे नेमणुक महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी तक्रारदार यांचेकडे ६३,५००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारल्याने दोघांवर कायदेशीर कार्यवाही.**

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरोकडे तक्रार दिली त्याची थोडक्यात हकिगत अशी की - तक्रारदार यांच्या पत्नी हया महिला बचत गटाच्या अध्यक्षा असुन त्या बचत गटामार्फत वाशी तालुक्यासाठी घरपोच पोषण आहार योजने अंतर्गत लाभार्थी यांना अंगणवाडी मार्फत खादय पुरविण्याचे काम करतात. सदरची योजना ही जिल्हा परिषद अंतर्गत महिला व बालविकास विभागामार्फत राबविली जाते. या अंतर्गत तक्रारदार यांचे पत्नीचे बिल काढणेसाठीची प्रक्रिया करणे व सदर योजनेसाठी प्रलंबित गहु मिळणेसाठी पत्र व्यवहाराची कारवाई करणेसाठी तसेच पोषण आहाराचे घेतलेले नमुने यावर कार्यवाही होऊ नये यासाठी मदत करणेसाठी लोकसेवक श्री. गोवर्धन निलकंठराव लांडगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, श्री. उमेश भगवानराव पवार, वरिष्ठ सहाय्यक, दोघे नेमणुक महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद हे ६३,५००/- रुपये लाचेची मागणी करित आहेत.

त्यामुळे पोलीस अधीक्षक मा. डॉ. श्रीकांत परोपकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांनी तक्रारीची शहानिशा केली. लोकसेवक श्री. लांडगे व पवार यांनी रक्कम आज स्विकारण्याचे ठरल्यामुळे पो.उप.अधी. श्री. गावडे यांनी आज दि. ३१.०८.२०१८ रोजी श्री. विनय बहिर, पोलीस निरीक्षक व अे.सी.बी. युनिट टीमच्या सहाय्याने सापळा रचला असता लोकसेवक श्री. गोवर्धन निलकंठराव लांडगे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, श्री. उमेश भगवानराव पवार, वरिष्ठ सहाय्यक, दोघे नेमणुक महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी ६३,५००/- रुपये स्विकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. सदरची लाचेची रक्कम ही महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद उस्मानाबाद येथे स्विकारण्यात आलेली आहे. यात भ्रष्टाचार प्रतिबंध (सुधारीत) अधिनियम सन २०१८ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. प्रकरणाचा पुढील तपास श्री. बी. व्ही. गावडे, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद हे करित आहेत.

ॲन्टी करप्शन ब्युरो, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांचे वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, अे.सी.बी. विभागाचे **मोबाईल ॲप्सद्वारे** **www.acbmaharashtra.net** या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :- ९६३७०६१४७८, **टोल फ्री क्र. १०६४**, दूरध्वनी क्र.- ०२४७२-२२२८७९

**प्रति,**

मा.संपादक, दैनिक

कृपया वरील वृत्त आपल्या दैनिकामध्ये प्रसिध्द करावे ही विनंती.

31/08/18

**(बी. व्ही. गावडे)**
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद.